# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**मध्यवर्ती कार्यालय, वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८**

**परिपत्रक क्र.०२ /२०२१**

क्र.राप/वाह/ सवलत/स्मार्टकार्ड / ११४

दिनांक :-०६ मार्च,२०२१.

प्रति,

**उपमहाव्यवस्थापक**, नियंत्रण समिती क्र. १ / २ / ३ यांस,

**विभाग नियंत्रक**,

रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड (पेण)/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ ठाणे/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर / नांदेड / उस्मानाबाद परभणी/ नागपूर/ भंडारा/ चंद्रपूर/वर्धा/ अकोला/ अमरावती/ यवतमाळ/ बुलडाणा/ गडचिरोली विभाग.

विषय : दिव्यांग व्यक्तीचे (अंध-अपंग) लाभार्थ्याचे स्मार्टकार्डचे नोंदणीकरणाबाबत.

संदर्भः १) शासन निर्णय क्र.एसटीसी-१०१७/प्र.क्र.५२५/परि-१, दि.९.१०.२०१८.

२)क्र.राप/वाह/स्मार्टकार्ड/२८०४ दिनांक ३१.०५.२०१९

------

रा.प. महामंडळाद्वारे विविध सामाजिक घटकांना प्रवासभाडयात सवलत देण्यात येते. राज्यातील दिव्यांग व्यक्तींना (अंध-अपंग) रा.प.महामंडळाच्या साधी, निमआराम व शिवशाही आसनी बसेसद्वारे सवलत अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्र.एसटीसी-१०१७/प्र.क्र.५२५/परि-१, दि.९.१०.२०१८ अन्वये दिव्यांग व्यक्ती (अंध-अपंग) यांना आधार संलग्न स्मार्टकार्ड देण्यात यावे असा शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे.

संदर्भित शासन निर्णयाच्या अनुषंगाने रा.प. महामंडळाने विविध सवलतधारी प्रवाशांना सवलत देण्याकरिता स्मार्टकार्ड प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. याबाबत संदर्भित पत्र क्र.२ अन्वये विभागांना सविस्तर सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. केंद्र शासनाने दिव्यांग (अंध-अपंग) व्यक्तींकरिता वैश्विक ओळखपत्र (Universal ID for person with disability) या योजनेद्वारे देण्यात आलेले ओळखपत्र दिव्यांग व्यक्तींकरिता असलेल्या सर्व सवलतींकरिता व इतर फायदे ग्राहय धरण्यात येते.

दिव्यांग व्यक्तीं (अंध-अपंग) लाभार्थ्यांच्या स्मार्टकार्डचे नोंदणीकरणाची कार्यप्रणाली विकसीत करण्यात आलेली आहे. दिव्यांग व्यक्तीचे स्मार्टकार्डचे नोंदणीकरणाकरिता विभागांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१. लाभार्थ्याकडे केंद्र शासनाचे युडीआयडी कार्ड असणे आवश्यक आहे.
२. आधारकार्ड असणे आवश्यक आहे.
३. त्याचबरोबर इतर ओळखपत्र म्हणजेच मतदान कार्ड, पॅनकार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, शासनमान्य अधिकृत कार्ड. असणे आवश्यक आहे.
४. युडीआयडी कार्ड व आधारकार्डचा ओटीपी येणार असल्याने नोंदणीकृत मोबाईल लाभार्थ्याकडे असणे आवश्यक आहे.
५. सदर लाभार्थ्याकडून नोंदणीकरण झाल्यानंतर रुपये ५०/- नोदणीकरणासाठी शुल्क आकारण्यात यावे.

..२..

Scanned with CamScanner

६. दिव्यांग (अंध-अपंग) व्यक्तीचे स्मार्टकार्डचे नोंदणीकरण करण्याबाबतची कार्यप्रणाली (एसओपी-स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोसिजर) सोबत जोडण्यात येत आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (वाहतूक)

**प्रत सादर रवाना :**

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी महाव्यवस्थापक (क व औ.सं.)/ महाव्यवस्थापक (आवेदन)/ महाव्यवस्थापक (भांडार व खरेदी), उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / मुख्य सांख्यिकी अधिकारी /उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) प्रशिक्षण संस्था भोसरी यांस माहितीसाठी.
- सहा. जनसंपर्क अधिकारी यांस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

D:\Desktop Backup १८.२.१९\smart card\smart card१.doc

Scanned with CamScanner